# कोयना जल विद्युत केंद्र संकुल, पोफळीमध्ये ट्रेनिंग सब सेंटरचे उद्घाटन

नॅशनल ट्रेनिंग पॉलिसी, न्यू दिल्लीच्या नियमानुसार प्रत्येक कर्मचाऱ्यांला (अभियंता, कामगार व इतर कर्मचारी) वर्षातून कमीत कमी ७ दिवस प्रशिक्षण देणे अनिवार्य आहे. सध्या महानिर्मितीमध्ये कोराडी प्रशिक्षण केंद्र नागपूर व नाशिक प्रशिक्षण केंद्र, एकलहरे ही दोन प्रशिक्षण केंद्रे कार्यरत असून जवळपास १५००० कर्मचाऱ्यांना या प्रशिक्षण देणे दुरापास्त आहे. त्यामुळे महाजेनकोच्या ट्रेनिंग पॉलिसीनुसार प्रत्येक मुख्य पॉवर स्टेशनमध्ये (औष्णिक, जल व वायु) **"सब ट्रेनिंग सेंटर"** स्थापनेबद्दल संकल्पना दिली गेली. या संकल्पनेनुसार कोराडी, चंद्रपुर, खापरखेडा व पारस येथील सब सेंटर कोराडी प्रशिक्षण केंद्र, कोराडी व नाशिक निर्मिती प्रशिक्षण केंद्राच्या अंतर्गत नाशिक, परळी, उरण, पोफळी व भुसावळ हे सब सेंटर्स असतील.त्यामुळे येथील कर्मचाऱ्यांच्या नाशिक वा कोराडी येथे जाऊन प्रशिक्षण घेण्यामध्ये होणारा वेळेचा अपव्यय टळला जाईल "ज्ञानगंगा आली दारी" असा प्रत्यय येथील प्रत्येक कर्मचाऱ्याला येईल. तसेच या सब सेंटर द्वारे जल विद्युत केंद्रा बद्दलची सखोल माहिती त्यांना उपलब्ध होईल. या सर्वाचा एकत्रित परिणाम विघुत उत्पादन वाढण्यासच होईल अशी मुळ कल्पना साकार होईल असे वाटते. कोयना जल विद्युत केंद्रामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकरिता ट्रेनिंग सब सेंटरची स्थापना दि.१८-०६-२००९ मा. श्री. रमेश कदम, महाव्यवस्थापक, कोयना जल विद्युत केंद्र संकुल, पोफळी यांच्या शुभहस्ते व मा. श्री. एस. बी. भांदेकर, अधीक्षक, अभियंता, नाशिक निर्मिती प्रशिक्षण केंद्र, एकलहरे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली. या प्रसंगी सर्व विभागप्रमुख तसेच श्री. एम्. एम्. मुठाळ, अधीक्षक अभियंता, कोयना टप्पा १ व २ पोफळी व श्री.एम्.व्ही.फाळके, अधीक्षक अभियंता (प्रशासन) व इतर सर्व सहकारी उपस्थित होते.

ट्रेनिंग सब सेंटरकरिता लागणाऱ्या किमान सर्व पायाभूत सुविधा (Training Infrastructure) उपलब्ध करुन दि. १८ / ०६ / २००९ पासुन या सब सेंटरद्वारे प्रशिक्षण कार्यास आरंभ करण्यात आला. सर्व प्रथम पोफळी पॉवर स्टेशन विषयी सविस्तर माहिती श्री.जाधव, सहाय्यक अभियंता यांनी दिली. त्यानंतर व्यक्तिमत्व विकास, वेळेचे व्यवस्थापन, संभाषण कला, सकारात्मक विचार व दृष्टीकोन बदल या विषयांवर श्री. एस. बी. भांदेकर अधीक्षक अभियंता यांनी सोदाहरण माहिती दिली. या ट्रेनिंग सब सेंटरमुळे जल विद्युत केंद्रात काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना अनुभवी व्याख्यात्यांतर्फे विविध विषयांवर मार्गदर्शन मिळणार असल्याने कर्मचाऱ्यांच्या कामात कुशलता तसेच त्यांचा आत्मविश्वास वृध्दींगत होईल, असे विचार श्री. रमेश कदम, महाव्यवस्थापक व श्री. एस्. बी. भांदेकर अधीक्षक अभियंता यांनी या प्रसंगी नोंदविले.

कोयना जल विद्युत केंद्र, पोफळी सब सेंटरच्या उद्घाटन कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता प्रामुख्याने श्री. जे. इब्राहिम, कार्यकारी अभियंता (निर्मिती प्रशिक्षण) नाशिक निर्मिती प्रशिक्षण केंद्र, एकलहरे, श्री. राऊत, उप. कार्यकारी अभियंता, तसेच श्री. तपस्वी, कनिष्ठ अभियंता यांनी विशेष परिश्रम घेतले.

## वैतरणा धरण पायथा विद्युत गृहाचा १७ वा वर्धापन दिवस उत्साहात साजरा

वैतरणा येथील धरण पायथा विद्युत गृहाचा १७ वा वर्धापन दिवस दि. २६ जून रोजी सत्यनारायण पुजा करुन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात रांगोळी प्रदर्शन, पताका, विद्युत रोषणाई करुन विद्युत गृह सजविण्यात आले होते. तसेच वैतरणा विभागातील सर्व कर्मचारी व पाहुण्यांसाठी सुग्रास भोजनाचा बेत करण्यात आला होता.

सदर प्रसंगी मुख्य महाव्यवस्थापक (जल) श्री. सी. एस. स्वामी , महाव्यवस्थापक पोफळी श्री. कदम , अधीक्षक अभियंता ज.वि.मं. श्री. कुरुंदकर , अधीक्षक अभियंता ज. वि. मं. श्री. जाधव यांच्या शुभेच्छा संदेशाचे वाचन करण्यात आले या कार्यक्रमासाठी वैतरणा विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. गजानन गावंडे, ज.वि.मं नाशिक येथील कार्यकारी अभियंता श्री. राजगडकर, उप कार्यकारी अभियंता श्री. चौधरी, श्री. भालेराव व इतर अधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

या प्रसंगी महानिर्मिती कंपनी मध्ये ३४ वर्षाची प्रदीर्घ सेवा देवून ३० जून रोजी निवृत्त होणारे श्री. सुधाकर पुंडलिक बडगुजर, प्र. श्रेणी २, यांचा सपत्नीक सत्कार केला गेला. या प्रसंगी श्री. गावंडे, श्री. राजगडकर, श्री. लोंढे, श्री. पिल्लाई व श्री. जामकर यांची श्री. बडगुजर यांच्या गौरवपर भाषणे झालीत.

या आनंदात्सवाचे नियोजन कनिष्ठ अभियंता श्री. पिल्लई, श्री. बाविस्कर, दुय्यम अभियंता श्री. इंगळे, श्री. बडगुजर व कारागीर श्री. जामकर, काळे, सय्यद व जाधव यांनी पार पाडले.

तसेच वैतरणा विभागातील सुर्या ६ मे.वॅ. जल विद्युत केंद्राचा ७ वा वर्धापन दिवस दि. १५ मे रोजी व भातसा १५ मे.वॅ. जल विद्युत केंद्राचा १२ वा वर्धापन दिवस दि. १८ जून रोजी वरील प्रमाणे साजरा करण्यात आला.